# कर्जातुन ठेव व इमारत निधी कपात न करण्याचा आदेश बेकायदेशीर व अव्यवहारीक

राज्याच्या सहकार आयुक्तांनी दि. ३१ मे २००५ रोजी राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी सभासदाच्या मंजूर कर्जातून ठेव व इमारत निधीची कपात करू नये व केल्यास संचालक मंडळावर कारवाई करण्यात येईल असे परिपत्रकाद्वारे आदेश दिलेले आहेत.( त्या परिपत्रकाच्या प्रत ' पतसंस्था परिवार' च्या ह्याच अंकात जशीच्या तशी पान क्र. वर प्रसिध्द केली आहे.)

मा. सहकार आयुक्तांचा हा आदेश पूर्णपणे बेकायदेशीर, अव्यवहारीक व पतसंस्था खऱ्या अर्थाने मजबूत व सदृढ होण्यासाठीचा आहे. आणि हा आदेश त्यांना भविष्य काळात मागे घेणे क्रमपात्र आहे. अन्यथा कायदेशीर कारवाईस सामोरे जाण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे.

मा. सहकार आयुक्तांनी नुकतेच सुधारीत आदर्श उपविधी (निवडणूक नियमावलीसह) महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा कलम १४ नुसार बंधन कारक केलेले आहे. त्या उपविधीमध्ये अ.१.१. ब. संस्थेच्या उद्देशामध्ये खालील उद्देश समाविष्ट केलेले आहेत.

१. सभासदांना काटकसर व सहकारी तत्वांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणे.

२. सभासदांकडून ठेवी स्विकारणे.

३. कर्ज काढणे किंवा निधी उभारणे

४. सभासदास तारणावर अथवा वैयक्तिक जामिनावर कर्ज देणे.

५. संस्थेच्या उपयोगासाठी मालकी हक्काने नोंदणी अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने जागा किंवा इमारत खरेदी करणे.

६. संस्थेने दिलेल्या कर्जासाठी तारण ठेवलेल्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेची येणे कर्जाच्या वसुलीसाठी विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे.

७. लघुउद्योग व गृहउद्योग आणि स्वयंरोजगार वृध्दींगत होण्यासाठी कर्ज पुरवठा करणे.

८. संस्थेच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, ती सुस्थितीत ठेवणे व तिचा कारभार पाहणे.

९. उपरोक्त सर्व किंवा एखादा उद्देश साधण्यासाठी लागणाऱ्या अनुषंगिक सर्व गोष्टी करणे.

त्याचप्रमाणे उपविधीमध्ये निधीसाठी खालीलप्रमाणे विविध बाबींचा समावेश केलेला आहे.

**क.१.१. निधी उभारण्याचे मार्ग**

संस्थेचे निधी खाली दिलेल्या मार्गांनी उभारले जातील.

१. भागभांडवल, २. निधी, ३. वर्गणी, ४. सभासदांकडून ठेवी, ५. कर्जे, ६. देणग्या, ७. आर्थिक सहाय्य.

**क्र.१.२.ठेवी व कर्जे**

कर्जे व ठेवीच्या रूपाने उभारल्या जाणाऱ्या एकुण निधीची मर्यादा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ३५ नुसार केली जाईल.

**नियम - ३५.**

मर्यादित जबाबदारी असलेल्या संस्थांनी कर्ज काढण्याच्या बाबतीतील शर्थी.

१) नियम - ३६ व ३७ यात उल्लेखिलेल्या संस्था व्यतिरीक्त मर्यादित जबाबदारी असलेल्या इतर कोणत्याही संस्था निबंधकांची पूर्व मंजूरी घेतल्याशिवाय आपले भरणा झालेले भागभांडवल, संचित राखिव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोट्याच्या रक्कमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रक्कमेच्या एकुण १०पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्करणार नाहीत.

२) कोणत्याही संस्थेस ठेवीचा स्विकार करून किंवा रकमा कर्जावू घेवून पोटनियम १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक रकमेची जबाबदारी पत्करता येईल.

**ड.१.१३. भागभांडवल, लाभांश व ठेवीवरील संस्थेचा हक्क -**

सभासदाकडून अगर माजी सभासदाकडून संस्थेचे येणे असेल तर त्यापोटी संस्थेत सभासदांच्या नावे असलेल्या भागावर, लाभांशावर व ठेवीवर संस्थेचा प्रथम अग्रहक्क व बोजा राहील. संस्था केंव्हाही सभासदाच्या जबाबदारीपोटी त्यास देय असलेली रक्कम वळती करून घेईल.

वरील सर्व गोष्टींचा एकत्रित आढावा घेतल्यास पतसंस्थांची उद्दीष्टे, निधी उभारण्याचे मार्ग यावरून पतसंस्थांना सभासदांकडून ठेवी व इमारत निधी घेण्याची स्पष्ट तरतूद सहकार आयुक्तांनीच करून दिलेली आहे. उपविधीमध्ये ठेव व इमारत निधी कशी घ्यावी यावर कुठेही विवेचन केलेले नाही. व आता आदेश काढल्यानंतर तशी बाब समाविष्ठ करणे बेकायदेशीरच आहे.

पतसंस्थांनी आपापल्या संस्थेचे उत्तम आर्थिक व्यवस्थापन करणे व त्या सुस्थितीत ठेवणे व दिलेल्या कर्जास जास्तीत जास्त चांगले तारण घेणे ही जबाबदारी अंतर्भूत आहे. कर्जातून ठेवीची कपात करावयाची नसेल तर पतसंस्थांनी ठेवी जमा करण्यासाठी दुसऱ्या कुठल्याही मार्गाचा अवलंब करण्यास अप्रत्यक्ष सांगणे ही बाबच मुळात सभासदांच्या व पतसंस्थांच्या सुध्दा आर्थिक हिताची नाही. राज्यातील १४ हजार पतसंस्थांपैकी स्वत:च्या मालकीची इमारत/जागा/कार्यालय उभे करण्यासाठी कर्जातून इमारत निधीची कपात न करण्याचे आदेश देणे म्हणजेच छोट्या पतसंस्थांनी स्वत:ची इमारत/जागा/ कार्यालय उभीच करू नये, म्हणजेच सभासद व ठेवीदारांना त्या पतसंस्थांबद्दल असुरक्षितता वाटावी व त्या पतसंस्था मोठ्या होवू नयेत हा या पाठीमागील दुष्ट हेतू या आदेशापाठीमागे आहे. १४ हजार पतसंस्थांपैकी १ कोटीच्या पुढे खेळते भाग भांडवल असलेल्या पतसंस्थांची संख्या १५०० च्या वर नाही. म्हणजेच ९३ टक्के पतसंस्थांनी आपल्या ठेवी व इमारत निधी कुठल्याही परीस्थितीत वाढवू नये व त्यांनी सतत कमकुवत राहून खात्याच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक गोष्टीसाठी यंत्रणेच्या अभावी गैरमार्गाने पैसे देण्यास भाग पाडणे, याशिवाय दुसरा हेतू असुच शकत नाही. छोटी माणसे म्हणजेच छोट्या संस्था ठेव व इमारत निधी कर्जातून कपात करण्यास चालू ठेवल्यावर या पतसंस्थांच्या ठेवी १ कोटी रूपयाच्या पुढे जर झाल्या तर संस्था आणखी कार्यक्षम

होतील व संस्थांचे व्यवस्थापन उत्तमरित्या चालविण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून घेतील. चांगला स्टाफ उपलब्ध करतील व हळुहळू खात्याच्या बाजारीकरणास आव्हान करतील व संबंधीतांची दुकानदारी अडचणीत येईल ही खरी भिती आहे. आणि इमारत निधी कर्जदाराच्या रकमेतून कपाती चालू ठेवल्यावर या छोट्या संस्था एक दिवस स्वत:च्या मालकीची इमारत / जागा / कार्यालय खरेदी करतील व ठेवीदारांना त्यामुळे सुरक्षितता वाटेल. तसेच त्यामुळे ठेवीदारांचाही ओघ वाढेल व संस्था सर्वार्थाने आर्थिक सक्षम होईल व त्यामुळे वरील धोरणाप्रमाणे संबंधितांची दुकानदारी अडचणीत येईल. हेच कटू सत्य आहे. कोणीही काहीही सांगितले तरी पतसंस्थांच्या सभासदांना दिलासा देण्याचे नावाखाली हे एक नाटक रचलेले आहे. कारण संपूर्ण भारत देशात स्वत:हून ठेवी ठेवणे व इमारतनिधीसाठी निधी देणे अशी मानसिकता छोट्या पतसंस्थांसाठी आत्मसात झालेली नाही. ठेवी व इमारत निधी जमा करण्याचे इतर कुठलेही मार्ग उपलब्ध करून देण्यास सहकार खाते व शासन पतसंस्थांसाठी १०० टक्के असमर्थ ठरलेले आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर महाराष्ट्र राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना मात्र शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून शेतकऱ्यांची वैयक्तिक प्रत्यक्ष लेखी संमती न घेता खालील कपाती केल्या जातात. १) रूपांतरीत ठेव २) परतीची ठेव – बिगर सभासद ३) ऐच्छिक ठेव ४) विस्तारवाढ ठेव ५) तात्पुरत्या ठेवी ६) रूपांतरीत ठेव – पूर्व हंगामी खर्चासाठी ७) रूपांतरीत ठेव – ६ टक्के व्याज (पूर्व हंगामी खर्चासाठी) ८) विकासाच्या नावाखाली ट्रस्ट, कॉलेज इ. साठी देणग्या.

साखर कारखाने व पतसंस्था या दोन्हीही महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या कायद्याखाली नोंदणी झालेल्या सहकारी संस्था आहेत. आणि राज्यातील ऊस उत्पादक या कपातीमुळे गेली वर्षानुवर्षे होरपळलेले आहेत. केलेल्या कपातीचे व्याज तर मिळत नाहीच परंतु आपली किती रक्कम ठेवीपोटी कापलेली आहे याचे एकत्रित पासबुक व ठेवीचा अर्ज भरून घेतलेला नाही. आणि या साखर कारखान्यांचे लेखा परिक्षण त्यांच्या स्थापनेपासून सातत्याने होत आहे. परंतू एकाही शासकीय लेखापरिक्षकाने किंवा सहकार आयुक्तांनी किंवा साखर आयुक्तांनी किंवा राज्य / केंद्र सरकारने या बाबींवर करोडो ऊस उत्पादकांना या राज्यात ठेवीवरील व्याज व ठेवीची पासबुके न मिळाल्यामुळे कारवाई केलेली नाही. याचे एकमेव कारण म्हणजे छोट्या कार्यकर्त्यांना / पतसंस्थांना कायमचे विकलांग व कमकुवत ठेवण्यासाठी हे उपाय सतत या ना त्या मार्गाने अवलंबिले जात आहेत.

पतसंस्था सभासदांना कर्जातून कपात केलेल्या ठेवीचे व्याज वेळेवर देऊन त्याचे एफ्. डी. आर. सुध्दा वेळेत देत असतात. व पतसंस्था कपात केलेल्या इमारत निधीमधून स्वत:ची जागा घेण्यासाठी सतत धडपडत असतात व हजारो पतसंस्था यामध्ये यशस्वी होत चाललेल्या आहेत. आणि हेच संबंधीतांना अडचणीचे ठरत चालले आहे.

कर्ज रकमेतून ठेवीची कपात व इमारत निधी कापू नये याच्या पाठीमागची भूमिका हास्यास्पद आहे. कारण सभासद कर्जे घेतेवेळी जर १५ टक्के ने कर्ज घेत असेल तर त्याच रकमेतून ११ टक्के ने ठेव कसा ठेवील, असा संबंधीतांचा युक्तिवाद आहे व इमारत निधी नफ्यातून उभी करावयाची असते असाही त्यांचा युक्तिवाद आहे. परंतू हा युक्तिवाद संबंधितांच्या अकलेचे दिवाळे काढण्याचाच एक प्रकार आहे. कारण कर्जातून ठेवीची कपात करणे हा पतसंस्थेचा उपविधी व कायद्याने दिलेला संस्थेच्या व सभासदाच्या हितासाठी आहे. तो कायदा जशाच्या तसा

आपल्या माहितीसाठी देत आहोत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चा ४९ –अ, ५० व ५१ खालीलप्रमाणे—

**४९– अ निव्वळ नफ्यावा हिशोब कसा करावयाचा.**

१) संस्थेने निव्वळ नफा काढताना तिला झालेल्या ठोक नफ्यातून पुढील बाबीची वजावट करावयाची आहे ती अशी:

१) जी कर्जे येणे आहेत व तिची मुदत संपली असून ताळेबंदाच्या दिवासापर्यंत ज्या कर्जावर होणारे व्याज (मात्र यात मुदत ठेवीवर जी कर्जे घेतली आहेत, किंवा सोन्याच्या तारणावरील कर्जे यांचा समावेश करावयचा नाही.)

२) कर्ज घेतले असल्यास किंवा ठेवी घेतल्या असल्यास त्यावर देय असलेले व्याज.

३) आस्थापनेचा खर्च (एस्टॅब्लिशमेंट चार्ज).

४) ऑडिट फी किंवा देखरेख फी.

५) दुरुस्ती, भाडे आणि कराचा चालू खर्च.

६) घसारा.

७) बोनस (अधिलांभाश) अधिनियम, १९६५ नुसार नोकरवर्गांना देय असलेला बोनस.

८) इन्कम टॅक्स देण्याची तरतूद

९) राज्य शांसनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा संघीय संस्थेला द्यावयाचा शिक्षण निधी.

१०) सहकारी रोजगार निधीस (को–ऑपरेटिव्ह एम्पॉयमेंट फंड) द्यावयाचे अंशदान.

११) बुडित व संशयित येणे याबाबतची तरतूद.

१२) भाग भांडवल परत देण्यासाठी तरतूद.

१३) गुंतवणुकीच्या किमतीत होणाऱ्या चढ – उतारासाठी तरतूद.

१४) सेवकाच्या निवृत्ती लाभाची तरतूद.

१५) कोणत्याही कायद्यानुसार देय होण्याजोगी मागणी.

१६) संशयित येणी आणि जमाखर्चाची नुकसानी, जी कोणत्याही निधीतून भरपाई केली नाही त्याची तरतूद

२) पोट – नियम (१) मध्ये ज्याचा संदर्भ दिला आहे, त्याखेरीज संस्थेच्या नफ्यातून पुढील रकमेची वजावट करण्यात येईल.

१) बुडित निधीसाठी किंवा हमी दिलेल्या रकमांसाठी जो निधी उभारण्यात त्या निधीस द्यावयाचे

२) संस्थेने जे सिक्युरिटी बॉन्डस् किंवा शेअर्स घेतले असतील त्यांत होणाऱ्या चढ – उतारासाठी जरुर वाटल्यास करावयाची तरतूद.

३) वरील सर्व तरतूदीचा वजावटीनंतर जो निव्वळ नफा उरेल तो मागील वर्षातून पुढे आणलेल्या रकमांध्ये मिळवून योग्य विभागणी करण्यासाठी उपलब्ध होईल.

**५०. नफ्याचा विनियोग :**

१) संस्थेस ज्या इतर उद्देशांसाठी आपल्या नफ्याचा विनियोग करता येईल ते उद्देश पुढीलप्रमाणे

असतील, म्हणजेच संस्थेच्या सभासदांचे शिक्षण व ज्ञानदान ही असतील व त्यात गरिबांना मदत, शिक्षण, वैद्यकिय मदत देणे आणि कोणत्याही इतर सार्वजनिक उपयोगाच्या बाबीचा प्रसार करणे व कोणतेही सरकारी किंवा धर्मादाय कारण यांचा समावेश होईल. परंतु अशा बांबीवरील खर्च निव्वळ नफ्याच्या शेकडा १० पेक्षा अधिक असता काम नये.

२) नियम ४९ – अ मधील तरतूदीनुसार जो निव्वळ नफा काढवयाचा, तो निव्वळ नफा काढल्यानंतर त्याचे वर्गीकरण पुढील शीर्षकाखाली तो जमा करण्यात येईल.

अ) विकास निधी ( डेव्हलपमेंट )

ब) लाभांश बरोबर करण्यासाठीचा निधी (डिव्हिडंड इक्विलायझेशन फंड )
किंवा

क) उपविधीनुसार केलेला कोणताही इतर निधी.

**स्पष्टीकरण** – या नियमातील कोणत्याही मजकुरामुळे कलम २ ची कंडिका (४) मध्ये अपेक्षित असल्याप्रमाणे कोणताही अधिलाभांश देण्यास प्रतिबंध होतो असे समजण्यात येता कामा नये.

**५१. संस्थेने आपला निव्वळ नफा ठरविण्यापूर्वी आपल्या नफ्यातून वजा करावयाच्या रकमा** – कलम ६५, पोट–कलम (२) च्या प्रयोजनासाठी आपला नफा ठरविण्यापूर्वी, संस्था कलम ६५, पो–कलम (१) यात उल्लेख केलेल्या रकमांव्यतिरिक्त, पुढील रकमा आपल्या नफ्यातून वजा करील: –

(एक) संस्थेने उभारलेल्या कर्जाच्या संबंधात शासनाकडून देण्यात आलेल्या हमीची वाजवीरित्या पुर्ती करता यावी म्हणून, हा अधिनियम, हे नियम किंवा संस्थेचे उपविधी यांच्या उपबंधान्वये स्थापन केलेला कोणताही निक्षेप निधी किंवा हमी निधी यासाठी द्यावयाचे कोणतेही असल्यास अशंदान;

(दोन) संस्थेने आपल्या गुंतवणुकीचा भाग म्हणून धारण केलेली कोणतीही तारणपत्रे प्रतिभूती बंधपत्रे किंवा शेअर्स यांच्या किमतीत होणाऱ्या ऱ्हासासाठी आवश्यक वाटेल अशी तरतूद;

(तीन) ऋण विमोचनासाठी व भाग भांडवली अशंदानासाठी म्हणून, शासनाने किंवा महासंघ संस्थेने करणे आवश्यक असलेली तरतूद. अशंदान असा निधी हा अधिनियम, त्याखालील नियम किंवा संस्थेची उपविधी यांच्या तरतूदीनुसार संस्थेने उभारलेल्या कर्जासाठी शासनाने जी हमी दिली असेल त्यासाठी उभारवयाचा निधी.

यावरून आपल्या लक्षात येईल कर्जातून ठेवी व इमारत निधीची कपात करण्यास बंदी आणण्याची कारणमिमांसा संपूर्ण बकवास, बेकायदेशीर व अव्यववहारिक आहे. एवढेच नव्हे तर दलालांच्या माध्यमातून पतसंस्थाची सहकारी चळवळ कमकुवत करुन नष्ट करण्याचा डाव आहे. तसेच सरकारी कागदपत्रामध्ये व लोकांसमोर प्रसिध्दी मिळविण्यासाठी ''आम्ही मागणी केली, निवेदने दिली, चर्चा घडवून आणल्या'' म्हणून हा आदेश मागे घेण्यात आला हे दर्शविण्यासाठी हा खटाटोप आहे. परंतू आता या राज्यात संबंधीत ढोंगी लोक, दलालाचे काम करतात ते सर्वांच्या लक्षात आलेले आहे. मा. सहकार आयुक्तांनी वेळीच हा आदेश त्वरीत मागे घ्यावा व ज्यांनी ही संकल्पना पध्दतशीरपणे घडवून आणली त्यांचे सर्व मागील पार्श्वभूमी संपत्ती, मालमत्ता तपासून पहावी. याचा

निष्कर्ष आम्ही वर लिहिल्याप्रमाणेच निघेल.

म्हणून पतसंस्थांना कळविण्यात येते की, मा. सहकार आयुक्तांच्या आदेशाने फार विचलीत होण्याचे कारण नाही. ठेवी स्वीकारणे व इमारत निधी उभारणे हा कायद्याने दिलेला पतसंस्थांचा अधिकार आहे. आणि तो अधिकार पतसंस्थानी आपापल्या पध्दतीने चाकोरीच्या बाहेर न जाता पतसंस्था, सभासद, सहकार चळवळ व राज्याच्या अर्थव्यवस्थेस पुष्टी देण्यासाठी अभ्यासपूर्वक वापरावा आणि पैसे मिळविण्याचा दुसरा मार्ग ज्यांनी या निमित्ताने शोधला आहे त्यांचे मनुसुबे यशस्वी होऊ देवू नयेत व तथा कथित दलाल या सहकार चळवळीत मार्गदर्शक व तत्वव्यक्ते ठरवून घेण्याची त्यांची संधी पुन्हा एकदा खेचून घ्यावी असे या निमित्ताने आव्हान करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**